# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर,बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

तक्रार क्र. १०५७/२०१८/छ.संभाजीनगर
(द्वितीय अपील क्र. ५१३७ /२०१७ मध्ये)

कुणाल सुरेशराव पिंपळे,रा.कावळे गल्ली,ह.मु.नारळा,ता.पैठण,जि.छत्रपती संभाजीनगर : तक्रारदार

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय पैठण,ता.पैठण छत्रपती संभाजीनगर, जि.छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी

## निर्णय
(सुनावणी दि.०७.११.२०२३ )

तक्रारदार यांनी दि.०४.१०.२०१८रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

"तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे

व्दितीय अपील क्र.५१३७/२०१७ च्या निर्णया आदेशानुसार मा.तहसीलदार यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच विहीत मुदतीत १५ दिवसाचे आत दिली नाही तसेच त्या दृष्टीने कोणतेही पत्रव्यवहार अर्जदारास केल नाही याची नोंद घ्यावी. तसेच सदर अपील क्र.५१३७/२०१७ सुनावणी दि.२८.०२.२०१८ व पुरवणी क्र.६९ नुसार मा.आयोगाचे आदेश पारित झाले आहेत. त्यानंतर अर्जदार यांनी संबंधित विभागात चौकशी केली असता अर्जदारास असे सांगण्यात आले आमच्या कडे सदर आदेशाची प्रत उपलब्ध झाली नाही."

सदर आदेशाची अंमलबजावणी केली नाही, अशी तक्रार करुन संबंधितावर कलम २०(१) (२) नुसार शिस्तभंग व दंडात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्र.५१३७/२०१७ मध्ये दि.२८.०२.२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले होते.

"वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.०८.०९.२०१७ रोजीच्या जोडपत्र "अ" प्रमाणे उपलब्ध माहिती/माहिती संदर्भातील वस्तुस्थिती कलम ७(६) नुसार आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाचे आत नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन दयावी व त्याची पोहच आयोगास सत्वर करावी. असा आदेश दिला आहे. "

सदर प्रकरणावर यापूर्वी दि.२८.०८.२०१९, दि.१७.०२.२०२०, दि.२३.०३.२०२१, दि.३०.०९.२०२१,दि.१४.०६.२०२३ रोजी सुनावणी झाली, सदरील प्रकरणात सुनावणी परिपूर्ण होण्यासाठी आज दि.७.११.२०२३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे.

श्री.आनंद बोबडे,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय पैठण व श्री.अरुण बी.पंडुरे,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथ नायब तहसीलदार तहसील कार्यालय पैठण यांना दि.१७.०७.२०२३ रोजी सुनावणीला उपस्थित राहण्यासाठी व

माहिती देण्यात आली अथवा कसे याबाबतचा खुलासा सादर करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली,

त्यानुसार श्री.अरुण बी.पंडुरे,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय पैठण (सध्या नायब तहसीलदार, गृह विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत) दि.३१.०८.२०२३व दि.२५.०९.२०२३ रोजी त्यांनी खुलासा सादर केला.त्यामध्ये त्यांनी कथन केले की,संदर्भ क्र.१ वरील नोटीसचे अनुषंगाने सविनय खुलासा सादर करतो की, मी नायब तहसीलदार महसूल १ या पदावर माहे जानेवारी २०१९ ते सप्टेंबर २०२१ पर्यत तहसील कार्यालय पैठण येथे कार्यरत होतो. तसेच मी माहिती अर्ज कालावधी दि.८.९.२०१७ व व्दितीय अपील सुनावणी दि.२८.०२.२०१८ व आयोगाचे आदेश पारित झाल्यानतंर दि.०९.०७.२०१८ या कालावधी मध्ये मी पैठण तहसील कार्यालय या ठिकाणी कार्यरत नव्हतो.त्यामुळे माझा सदर खुलासा मान्य करुन प्रकरणी माझ्र्या यांविरुध्द दंड अथवा शास्तीची कार्यवाही करण्यात येऊ नये, अशी विनंती केली आहे.

तसेच श्री.आनंद बोबडे,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय पैठण (सध्या अप्पर तहसीलदार, मेटिखेडा, ता.कळंब,जि.यवतमाळ येथे कार्यरत) दि.१८.०९.२०२३ रोजी त्यांनी खुलासा सादर केला.त्यामध्ये त्यांनी कथन केले की, (१).मी दिनांक०७.०६.२०१६ ते दि.०९.०१.२०१९ या कालावधीत तहसील कार्यालय पैठण येथे नायब तहसीलदार महसूल-१ या पदावर कार्यरत होतो. (२).सदर माहितीच्या अधिकारातील मुळ अर्ज,प्रथम अपील अर्ज,व्दितीय अपील अर्जाबाबत सुनावणीच्या नोटीसा, तसेच मा. राज्य माहिती आयुक्त यांनी दिलेला निर्णय यापैकी कोणताच अर्ज किंवा प्रकरण हे माझ्याकडे सादर करण्यात आले नाही. वारंवार लेखी व तोंडी सुचना देऊन ही संबंधित कर्मचारी/सहायक माहिती अधिकारी हे माहितीच्या अधिकारासारख्या महत्वाच्या विषयाचे अर्ज सादर करीत नव्हते. सदर बाब ही मी तत्कालीन मा.तहसीलदार पैठण यांच्या निदर्शनास आणून दिली होती. तसेच सदर बाब ही त्यांच्याकडे सादर करण्यात आली होती. तसेच त्यांच्याकडून दंडाची रक्कम वसूल करणेबाबत आदेश दिले होते. सदर जबाबदार असणारे कर्मचारी तथा सहा. माहिती अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस दिली होती.परंतु सदर खुलाश्याचे अवलोकन केले असता त्यांनी त्यासंबंधी आवश्यक तो पुरावा प्राप्त नाही/सादर केला नाही. त्यामुळे त्यांच्या लेखी खुलाश्यामध्ये तथ्यांश दिसून येत नाही.

आज दिनांक ०७.११.२०२३रोजी सुनावणीस,श्री.अरुण बी.पंडुरे,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय पैठण (सध्या नायब तहसीलदार, गृह विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत) व तक्रारदार कुणाल सुरेशराव पिंपळे हे उपस्थित आहेत, तर श्री.आनंद बोबडे,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय पैठण (सध्या अप्पर तहसीलदार, मेटिखेडा, ता.कळंब,जि.यवतमाळ येथे कार्यरत) हे कोणतीही पूर्वसुचना न देता अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी तक्रारदार कुणाल सुरेशराव पिंपळे, यांनी सुचित केले की, त्यांना कोणत्याही प्रकाराची माहिती उपलब्ध झाली नाही. तसेच श्री.आनंद बोबडे,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय पैठण यांनी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध देण्याविषयी वर नमूद केल्याप्रमाणे कोणती कार्यवाही केली आहे,याबाबतचा पुरावा त्यांनी त्यांच्या खुलाश्यामध्ये सादर केलेला दिसून येत नाही. तसेच श्री.आनंद बोबडे,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय पैठण (सध्या अप्पर तहसीलदार, मेटिखेडा, ता.कळंब, जि.यवतमाळ येथे कार्यरत) आज दि.०७.११.२०२३ रोजीच्या सुनावणीसाठी कोणतीही पूर्वसुचना न देता ते आयोगासमोर गैरहजर राहिले आहेत. यावरुन त्यांना या प्रकरणात काहीही म्हणायचे नाही असे दिसून येत आहे. या सर्वबाबींमुळे ते स्वत:हुन शिक्षेसाठी पात्र ठरत आहे.

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात, आयोगाने आदेशित करुनही माहिती न देणे, आयोगाच्या आदेशाची अवहेलना करणे, अशा बाबी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायदयाच्या उल्लंघन करणा-या ठरतात. या प्रकरणी श्री.आनंद बोबडे,तत्कालीन जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय पैठण यांनी अशा सर्व कृती करुन अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस स्वत:ला पात्र ठरविलेले आहे. त्यामुळे श्री.आनंद बोबडे,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय पैठण (सध्या अप्पर तहसीलदार, मेटिखेडा, ता.कळंब,जि.यवतमाळ येथे कार्यरत) यांना याप्रकरणी रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती अंतिम करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

प्रस्तुत प्रकरणात वर नमुद केल्याप्रमाणे जबाबदार श्री.आनंद बोबडे,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय पैठण (सध्या अप्पर तहसीलदार, मेटिखेडा, ता.कळंब,जि.यवतमाळ येथे कार्यरत) यांचेकडुन शास्तीची रक्कम वसूल करून ती खालील लेखा शिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (८) (क) व १९ (७) अन्वये जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचेवर निश्चित करण्यात येत आहे.

**लेखाशिर्ष** :- **००७०- इतर प्रशासनिक सेवा**
**६०- इतर सेवा**
**८००- इतर जमा रक्कम**
**१८- माहितीचा अधिकार ००७०-००६-१**

वर नमुद केल्याप्रमाणे शास्तीची वसुली जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त विवेचनानुसार श्री.आनंद बोबडे,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय पैठण (सध्या अप्पर तहसीलदार,मेटिखेडा,ता.कळंब, जि.यवतमाळ येथे कार्यरत) यांना या प्रकरणी रु.२५,०००/-इतकी शास्ती करण्यात येत आहे. तसेच सदर शास्तीची रक्कम वसूल करुन उपरोक्त दिलेल्या लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (८) (क) व १९(७) अन्वये जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. यानुसार तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

तक्रार क्र.१०५७/२०१८/छत्रपती संभाजीनगर / एबीजे/जावक क्र. 19625 दि. 26/12/2023
प्रत: माहिती तथा कार्यवाही/अंमलबजावणीस्तव अग्रेषित.

१. श्री.आनंद बोबडे,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय पैठण (सध्या अप्पर तहसीलदार, मेटिखेडा, ता.कळंब,जि.यवतमाळ येथे कार्यरत) यांना **मार्फत** :-जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर

२. जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर